दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३४३ वा | सोमवार दि. ९ ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## तीन दिवस कारवाई, पाच कोटींचं एमडी ड्रग्स जप्त



**नाशिक ।** धार्मिक नगरी म्हणून समजल्या जाणाऱ्या नाशिकची ओळख आता ड्रग्सचे माहेरघर अशी होऊ लागलीय का? अशी भिती आता व्यक्त केली जात आहे. मुंबई पोलिसांची कारवाई, त्यानंतर नाशिक पोलिसांनी टाकलेली धाड, या तीन दिवसांच्या कारवाईत जवळपास ५ कोटी रुपयांची ४ किलो ७८० ग्रॅम एमडी ड्रग्स पावडर आणि कच्चा माल हस्तगत करण्यात आला. या कारवाईने जिल्ह्यासह राज्यभरात एकच खळबळ उडाली. मागील दोन दिवस पुण्याच्या ससून रुग्णालयातून पळालेला ललित पाटील याची चर्चा होती.

## न्यूज कॉलम

### टँकरला धडकून तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** शहरालगत गुरुद्वारा बायपासवर गॅस टँकरला (एमएच ४६ बीबी १७७६) दुचाकीने मागून जोरदार धडक दिली. या अपघातात एक जण जागीच ठार, तर अन्य एक जण जखमी झाला. हा अपघात झाला. पेट्रोलिंगवरील पथकाने अपघातग्रस्त तरुणांना रुग्णालयात हलविले. प्रवीण सुकदेव पवार (वय २५, रा. मानके, ता. मालेगाव, जि. नाशिक) याचा गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला. तसेच विजय अशोक सोनवणे (रा. मानके, ता. मालेगाव, जि. नाशिक) जखमी झाला.

### पैशांवरून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**साक्री ।** उधारीने पैसे मागण्यावरून पुतण्याला दोघा काकांनी मारहाण केली. रॉडने डोक्यावर मारून जखमी केले. याबाबत आकाश गणेश सोनवणे याच्या तक्रारीनुसार अंगणात उभा होता. तेव्हा घरासमोरील काका मच्छिंद्र रूपा सोनवणे व प्रताप रूपा सोनवणे यांनी उसने पैसे मागण्याच्या कारणावरून आकाशला शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. प्रतापने लोखंडी रॉडने डोक्यावर मारून ठार करण्याची धमकी दिली.

# मंत्री दादा भुसे यांच्या बदनामी प्रकरणी खासदार संजय राऊतांवर अब्रुनुकसानीचा खटला दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक गिरणा सहकारी साखर कारखान्यात मंत्री दादा भुसे यांनी १७८ कोटी रुपयांचा शेअर्स घोटाळा केल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी सामनामधून केला होता. वृत्तपत्रातून चुकीचा व बदनामीकारक मजकूर प्रसिध्द केल्याचा आरोप करत नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर मालेगावच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला आहे.

शिवसेना फुटीनंतर मालेगावमध्ये मे २०२३ मध्ये उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत जाहीर सभा घेण्यात आली. यावेळी संजय राऊतांनी गिरणा साखर कारखान्यात मोठा घोटाळा झाल्याची भुसेंवर अप्रत्यक्ष टीका केली होती. त्याचबरोबर सामनातून देखील गिरणा सहकारी साखर कारखान्यात कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप संजय राऊत यांनी दादा भुसे यांच्यावर केला होता. आरोप सिद्ध करा, भुसेंचे आव्हान त्यानंतर दादा भुसे यांनी काही दिवसाचा अवधी देत संजय राऊतांना हे आरोप सिद्ध करण्याचे आव्हानही दिले होते. मात्र त्यानंतर आता दादा भुसे यांनी थेट कोर्टात धाव घेत संजय राऊतांवर अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला आहे. वृत्तपत्रातून चुकीचा व बदनामीकारक मजकूर प्रसिध्द केल्याचा आरोप करत मालेगावच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हा खटला दाखल करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

दरम्यान जेष्ठ विधीज्ञ सुधीर अक्कर यांच्यामार्फत दाखल केलेल्या या फौजदारी खटल्यात मंत्री दादा भुसे यांची जन सामान्यांमध्ये प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने सामना या वर्तमानपत्रातून बदनामी केल्याने आरोप खासदार संजय राऊत यांच्यावर करण्यात आला आहे. यापूर्वी खासदार राऊत यांच्या मुंबई व दिल्ली येथील निवासस्थानी केलेल्या आरोपांबाबत पुरावे व खुलासा देण्याबाबत नोटीस बजावली होती. मात्र राऊत यांच्याकडून कुठलेही उत्तर त्या नोटीसिस प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे सामना या वृत्तपत्राचे कात्रण व इतर पुरावे जोडून हा खटला दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या खटल्या संदर्भात खासदार संजय राऊत यांना २३ ऑक्टोबरला मालेगाव येथील मे. न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे.



### प्रथम मालेगावच्या सभेत झाले गंभीर आरोप

**गिरणा सहकारी साखर कारखान्याचा लिलाव थांबविण्यासाठी दादा भुसे यांनी गिरणा बचाव समिती स्थापन केली. कारखाना वाचविण्यासाठी निधी उभारण्यासाठी पुढे येण्याचे जाहीर आवाहन केले. मालेगावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, शेतकरी, मजूर हे या भावनिक आवाहनाला बळी पडले. गिरणा मोसम शुगर ॲग्रो ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नावाने हजारो लोकांकडून शेअर्ससाठी पैसे जमा करून १७८ कोटी २५ लाख ५० हजार १० रुपये या शुगर ॲग्रोचे प्रवर्तक, प्रभारी दादा भुसे यांनी हडपले, असा आरोप जाहीर सभेत ठाकरे गटाचे अद्वय हिरे यांनी केला होता. त्यानंतर संजय राऊत ट्विटर सामानातून या प्रकरणावर प्रकाश टाकत कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. या पार्श्वभूमीवर दादा भुसे यांनी थेट कोर्टात खेचले आहे.**

### २३ ऑक्टोबरला हजर राहण्याचे आदेश

**जेष्ठ विधीज्ञ सुधीर अक्कर यांच्यामार्फत दाखल केलेल्या या फौजदारी खटल्यात मंत्री दादा भुसे यांची जन सामान्यांमध्ये प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने सामना या वर्तमानपत्रातून बदनामी केल्याने आरोप खासदार संजय राऊत यांच्यावर करण्यात आला आहे. यापूर्वी खासदार राऊत यांच्या मुंबई व दिल्ली येथील निवासस्थानी केलेल्या आरोपांबाबत पुरावे व खुलासा देण्याबाबत नोटीस बजावली होती. मात्र राऊत यांच्याकडून कुठलेही उत्तर त्या नोटीसीस प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे सामना या वृत्तपत्राचे कात्रण व इतर पुरावे जोडून हा खटला दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या खटल्या संदर्भात खासदार संजय राऊत यांना २३ ऑक्टोबरला मालेगाव येथील मे. न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे.**

# धनगर समाजाला महिनाभरात एसटीचे प्रमाणपत्र द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन



### क्रांती शौर्यसेनेच्या कल्याणी वाघमोडे यांचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**

पाऊण शतकापासून धनगर समाजाला हक्कापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले आहे. आम्ही नव्याने आरक्षण मागत नाही, त्यामुळे आदिवासी समाजाने विरोध करण्याचे कारणच नाही. सरकारने महिनाभरात धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी)चे प्रमाणपत्र द्यावे, अन्यथा ३० ऑक्टोबरला मुंबईत आझाद मैदानावर आणि ७ ते ११ डिसेंबरदरम्यान दिल्लीत जंतरमंतर मैदानावर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा क्रांती शौर्यसेनेच्या कल्याणी वाघमोडे यांनी दिला. शहरातील साक्री रोडवरील पत्रकार भवनात रविवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

यावेळी सुनील वाघ, पंडित मदने, गोपाल माने, मनोज गर्दे, नगरसेवक अमोल मासुळे, किशोर सरगर, छोटू थोरात, सुभाष मासुळे, विद्या ठोंबरे, महेंद्र नजन, आदित्य भोगे, अण्णा खेमनार उपस्थित होते. धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र द्यावे, ही मागणी अनेक वर्षापासूनची आहे. ७५ वर्षांपासून धनगर समाज न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. संविधान कलम ३४२ हे अनुसूचित जमातीचे आहे. अनुसूचित जमाती आदेश १९५० (सी.ओ. २२) नुसार राष्ट्रपतींनी अनुसूचित जमातीची क्रमांक १ ते ४७ नुसार सर्व जमातींची नावे प्रसिद्ध केली आहेत. त्या यादीत क्रमांक ३६ वर धनगर जमातीचा समावेश आहे. हा अध्यादेश देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ६ सप्टेंबर १९५० मध्ये काढला आहे. तसेच तसा ठराव लोकसभेने संमत केला आहे. राज्यघटनेप्रमाणे धनगर समाजाला एसटीचे प्रमाणपत्र मिळावे, ओबीसीची जातनिहाय जनगणना करण्यात यावी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त शासकीय सुटी जाहीर करावी, चौंडी येथे अहिल्यानगर नामांतराच्या घोषणेची पूर्तता करावी, मेंढपाळांसाठी संरक्षण व मेंढ्यांसाठी राखीव चराई क्षेत्र तसेच विमा उपलब्ध करावा, आरक्षण आंदोलनातील युवकांवर दाखल गुन्हे माघार घ्यावेत, आदी मागण्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य करून धनगर समाजाला न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. अन्यथा, आगामी लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये धनगर समाज मतांमधून जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही क्रांती शौर्यसेनेच्या वाघमोडे यांनी दिला.



# माणसे मारा...!

देशाचे सांप्रत जे यश आहे ते आहे आणि अपयश आहे तेही आहेच. कोणत्याही राज्यात आणि विशेषत: महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात सरकारी रुग्णालयांमध्ये माणसे धडाधड मरून जावीत, त्यात अनेक बालके असावीत आणि त्याची कुणालाही शरमही वाटू नये, असे निलाजरे पर्व महाराष्ट्रात दीर्घकाळ सुरू आहे. त्यापासून सुटका व्हायची असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी स्थानिक पातळीपासून सर्वत्र पक्षनिरपेक्ष, निष्पक्ष संघटन बांधून प्रत्येक पायरीवर सरकारला जाब विचारायला हवा. सगळ्या सरकारी रुग्णालयांमध्ये केवळ दीड महिनाच पुरेल इतका औषधसाठा असल्याचे विशेष वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स'ने प्रकाशित केल्यावर आता जी धावाधाव सुरू झाली आहे, ती आधीच झाली असती तर आज ही वेळ आलीच नसती. नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या जिल्हा रुग्णालयांमध्ये गेले काही दिवस जे मृत्युसत्र सुरू झाले आहे, त्याची आता 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा'ने दखल घेतली आहे आणि राज्याच्या मुख्य सचिवांना नोटीस धाडली आहे. चार आठवड्यांमध्ये तिचे उत्तर द्यावयाचे आहे. याशिवाय, आयोगाने आपला एक स्वतंत्र प्रतिनिधी नेमला असून त्याद्वारे स्वतंत्र अहवाल आयोगाला मिळेलच. मानवाधिकार आयोगाने त्वरित ही पावले टाकली, ही समाधानाची पण प्राथमिक बाब आहे. यातून पुढे राज्य सरकारमध्ये किंवा खात्यांच्या कामांमध्ये काही दिवे लागणार आहेत का, हे कालांतराने समजेल.

वैद्यकीय महाविद्यालयांशी जोडलेल्या रुग्णालयांचा राज्यातील कारभार ही गेल्या काही दिवसांत अत्यंत चिंतेची बाब बनली आहे. नांदेड येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा सर्वोपचार रुग्णालय येथे औषधांचा पुरवठा सुरळीत आहे का, तेथे सगळी आवश्यक औषधे पुरेशी आहेत का, याची शंका आहे. हीच स्थिती राज्यातील इतरही सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये असल्यास नवल नाही. राज्यात औषध खरेदी आणि त्यातील गैरप्रकार यांची अनेक प्रकरणे आजवर गाजली आहेत. मात्र, राज्य सरकारने त्याचा योग्य तो धडा घेऊन खरेदी आणि वितरणाला वेग दिला आहे, असे दिसत नाही. राज्यातील औषध खरेदी वेगाने व्हावी, यासाठी राज्य सरकारने औषध खरेदी संचालनालय स्थापन केले खरे; पण त्याचे काम अजूनतरी नीट चालू झालेले दिसत नाही. हे संचालयानलय, औषध खरेदी करणारी हाफकिन संस्था, राज्यातील आरोग्यविषयक खाती सांभाळणाऱ्या मंत्र्यांचे आग्रह आणि नोकरशहांची चालविलेली हेळसांड या साऱ्याचा परिणाम राज्यातील औषध पुरवठ्यावर झाला आहे. जिल्हा रुग्णालयांमध्ये शोकांतिका झाल्यानंतरही आमचे लोकप्रतिनिधी किती लज्जास्पद वर्तन करतात, हे ही नांदेडमध्ये दिसलेच आहे. राज्यात काहीही खुट्ट झाले की सगळे त्याचे राजकारण करायला लगेच पुढे सरसावतात. आरोप सुरू करतात. 'मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणे' असते ते हेच. राज्यातले सगळे प्रमुख पक्ष गेल्या पाच वर्षांत कधी ना कधी सत्तेवर होते. आज जे काही चालू आहे, त्याची जबाबदारी सर्वांची आहे. पण संधी मिळाली की राजकारण करायचे आणि आरोप सुरू करून मूळ विषयावरून लक्ष भलतीकडेच न्यायचे, ही सगळ्या राजकीय पक्षांची बनचुकेगिरी बनली आहे. राज्यातील एकूण आरोग्य खर्चातील तीस टक्के रक्कम आणि केंद्राच्या योजनांमधील दहा टक्के रक्कम जर जिल्हा पातळीवर वर्ग केली असेल तर औषधांचा तुटवडा पडतोच कसा? याशिवाय, राज्यातील त्रिस्तरीय आरोग्य व्यवस्था उत्तम, कार्यक्षम आणि उत्तरदायी बनविण्याचे काम कोणत्याही सरकारने मनावर घेतलेलेच नाही. राज्यातील ३६५ ग्रामीण रुग्णालये, ८० उपजिल्हा रुग्णालये, एक हजार ८२० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दहा हजार पाचशे उपकेंद्रे यांचा कारभार व्यवस्थित सुरू राहिला आणि तेथे योग्य ते उपचार मिळाले तर सगळ्यांची धाव जिल्हा रुग्णालयांकडे सुरू होणार नाही. मात्र, आज ही त्रिस्तरीय यंत्रणा पुरती ढेपाळलेली आहे. त्यामुळे, सगळा ताण जिल्हा रुग्णालयांवर येतो. ही सगळी अवाढव्य यंत्रणा कार्यक्षम करण्याचे आव्हान राज्यातल्या मंत्र्यांनी पेलून दाखवावे. मात्र, त्यातल्या अनेकांना नुसते बोलता येते. करता काहीच येत नाही. नांदेड आणि संभाजीनगर येथे परिस्थिती पूर्ण हाताबाहेर गेली. पण इतर २१ जिल्हा रुग्णालयांची स्थिती काही वेगळी नसेल.

# जातनिहाय गणना; नवे आव्हान

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यात जातनिहाय गणना करून त्याचा अहवाल जाहीर करून राजकारणात मोठी खेळी खेळली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जातनिहाय गणना झालीच नव्हती. दुर्बल घटकांना व मागास जातींना शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणे घटनेनेच बंधनकारक केले आहे. त्यासाठी मागास व दुर्बल जातीची लोकसंख्या किती आहे हे समजावे यासाठी जातनिहाय गणना करणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद केला जात आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांत जातनिहाय गणना कोणत्याही पक्षाच्या केंद्र सरकारने केली नव्हती किंवा कोणत्याही राज्याने त्यासाठी पुढाकार घेतला नव्हता. १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यानंतर देशभर आरक्षणाच्या विरोधात संघर्ष उसळला, त्याचा परिणाम कोणत्याही सरकारने जातनिहाय गणना करण्याचे धाडस केले नव्हते. पण गेली चार, साडेचार दशके सत्तेच्या परिघात राहिलेल्या नितीश कुमार यांनी मोठ्या मुत्सद्दीपणाने राज्यातील सत्तेचा वापर करून बिहारमध्ये जातनिहाय गणना राबवली व त्याचा अहवालही जाहीर केला.

आरक्षणाचा लाभ सुरुवातीपासून अनुसूचित जाती, जमातींचा मिळत होता. पण ओबीसींकडे दुर्लक्ष होत राहिले, असा मुद्दा मांडला जात आहे. शेकडो जाती व उपजातींचा ओबीसींमध्ये अद्याप समावेश झालेला नाही. बिहारमध्ये १९७७ मध्ये कर्पूरी ठाकूर मुख्यमंत्री असताना सामाजिक न्याय देण्यासाठी त्यांनी मुंगेरीलाल आयोगाने ओबीसींच्या संदर्भात केलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. नितीश कुमार यांच्या सरकारने केलेल्या जातनिहाय गणनेमुळे ओबीसींसह सर्व जातींची आकडेवारी बाहेर आली. कर्पूरी ठाकूर यांनी मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या टर्ममध्ये १९७८ मध्ये अति मागासवर्गीयांना १२ टक्के व मागासवर्गीयांना ८ टक्के आरक्षण देऊ केले. जातनिहाय जनगणना करण्यास भाजप टाळाटाळ करते असा समज भाजपचे विरोधक निर्माण करीत आहेत. पण देशात सर्वत्र ओबीसी मतदारांनी गेली दहा वर्षे भाजपला भरभरून मतदान केले आहे हे कसे विसरता येईल. विरोधी पक्ष जातनिहाय गणनेवरून भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे पण ओबीसी मतदारांचा विरोधी पक्षांपेक्षा भाजपवर जास्त विश्वास आहे हे २०१४ पासून प्रत्येक निवडणूक निकालाने दाखवून दिले आहे. समाजातील सवर्ण, ओबीसी हा भाजपचा मोठा मतदार आहे. सन २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे खासदार बहुमताने निवडून आले. जवळपास तीन दशकांनंतर एका राजकीय पक्षाला लोकसभेत स्वबळावर बहुमत प्राप्त झाले. अर्थात याचे श्रेय नरेंद्र मोदी यांच्या करिष्माई नेतृत्वाला आणि अमितभाई शहा यांच्या संघटन कौशल्याला आहे.

बिहारमध्ये झालेली जातनिहाय गणना व त्याचा अहवाल नितीश कुमार यांच्या सरकारने जाहीर केल्यानंतर त्या अहवालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देण्यात आले आहे. जातनिहाय सर्वे




क्षणात १३ कोटी ७ लाख, २५ हजार ३१० लोक सामील झाले. बिहारमधील जातनिहाय गणनेत हिंदू धर्मियांची संख्या ८२ टक्के आहे. त्यानंतर मुस्लीम लोकसंख्या १७.७० टक्के आहे. राज्यात जातनिहाय गणना करावी, असा बिहार विधानसभेने एकमताने ठराव संमत केला होता. गेल्या वर्षी ६ जून रोजी बिहार मंत्रिमंडळाने तसा निर्णय घेतला. जातनिहाय गणना करण्यासाठी ५०० कोटी रुपये खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. मात्र जातीवर आधारित जनगणनेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका पाटणा उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. त्या सर्व याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या व त्यानंतर जातनिहाय गणनेचा मार्ग मोकळा झाला.

भाजपकडे ओबीसी मतदार मोठ्या संख्यने झुकला आहे म्हणून काँग्रेससह अनेक राजकीय पक्षांना ओबीसींचा अचानक कळवळा आला आहे. राहुल गांधी यांनी महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देताना ओबीसींसाठी स्वतंत्र कोटा ठेवावा, अशी मागणी केली होती. बिहारचा जातनिहाय गणना अहवाल जाहीर होताच राहुल गांधी आता त्याच्या सभांमध्ये 'जितनी आबादी, उतनी भागीदारी' अशी घोषणा करीत आहेत. लोकसभेत एकूण ५४३ खासदार आहेत. पैकी ४२.७ टक्के खुल्या वर्गातील आहेत, तर ओबीसी प्रवर्गातील केवळ २२ टक्के खासदार आहेत. देशात अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.०६ टक्के आहे. पण लोकसभेत या वर्गाच्या खासदारांची संख्या १५.८३ टक्के आहे. अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८.६ टक्के आहे. पण लोकसभेतील या वर्गातील खासदारांची संख्या ९.५७ टक्के आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी १७ मार्च २०२२ रोजी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये खुल्यावर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण ग्रुप १ मध्ये ६१ टक्के व ग्रुप २ मध्ये ५२ टक्के असल्याचे मान्य केले आहे. अधिकारी वर्गात ग्रुप ए मध्ये खुल्यावर्गात असलेल्यांचे प्रमाण ६४.५ टक्के आहे, तर ओबसी १६.८ टक्के, एससी- १२.०८ टक्के, तर एसटी ८. ६ टक्के अधिकारी म्हणून केंद्रीय नोकरीत आहेत. बिहारचा विधानसभेत ओबीसी आमदारांची संख्या ९९ आहे. खुल्या वर्गातील आमदार ७१, एससी ४० तर एसटी २ व मुस्लिम १९ आमदार आहेत. बिहारमध्ये झालेल्या जातनिहाय गणनेत यादवांची संख्या मोठी आहे. यादव १४.२६ टक्के आहेत. मुस्लिमांची १७.७ टक्के लोकसंख्या आहे. मुस्लीम-यादव मिळून (एमवाय) व्होट बँक ३२ टक्के आहे. ओबीसींमधील कोइर व कुर्मी हे मतदार नितीश कुमार यांच्या पाठीशी उभे असतात. बिहारमध्ये कोइर ४.२१ टक्का आहेत, तर कुर्मी हे अवघे २.८७ टक्के आहेत. दोन्ही समाजाची मिळून ही लोकसंख्या ७ टक्के होते. बिहारमध्ये झालेल्या जातनिहाय गणनेत सवर्णांची लोकसंख्या १५.५२ टक्के असल्याचे आढळले. त्यात ब्राह्मण ३.६७ टक्के, राजपूत ३.४५ टक्के आणि भूमिहार २.८९ टक्के आहेत.

बिहारमधील जातनिहाय गणनेचे मॉडेल म्हणजे भाजप विरोधकांना एक राजकीय हत्यार प्राप्त झाले आहे. सन २०१० मध्ये केंद्रात काँग्रेसप्रणीत यूपीएचे सरकार होते. तेव्हा डॉ. मनमोहन सिंग सरकारने महिला आरक्षण विधेयक मांडले होते, पण त्यात ओबीसींसाठी स्वतंत्र कोट्याची तरतूद नव्हती. आता त्याबद्दल राहुल गांधी खेद व्यक्त करीत आहेत. भाजप विरोधकांना म्हणजे इंडिया नामक आघाडीला जातनिहाय गणना हा प्रचाराचा मुद्दा बनवायचा आहे, पण त्यावर किती मतदार आकर्षित होऊ शकतात, हे ठामपणे सांगता येत नाही. इंग्रजांच्या काळात जातनिहाय गणना होत असे. १८८१ मध्ये पहिल्यांदा इंग्रजांनी देशात जातनिहाय गणना केली. १९३१ पर्यंत ही प्रथा चालू होती. १९४१ मध्ये जनगणना झाली. पण त्याची आकडेवारी जाहीर झाली नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या वेळच्या प्रमुख नेत्यांनी जातनिहाय गणना करू नये असे ठरवले. स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये जनगणना झाली पण त्यात जातनिहाय गणना केली गेली नाही. केवळ एससी, एसटी अशी गणना झाली. कारण त्यांना घटनेनुसार आरक्षण देणे बंधनकारक आहे. जातीच्या आधारावर आरक्षण मिळावे, अशी पहिली मागणी उत्तर प्रदेशातून काशीराम यांनी केली.

भारत सरकारने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागास जातींना आरक्षण देण्यासाठी मंडल आयोगाची स्थापना केली. १९८० च्या दशकात जातीवर आधारित नोकऱ्या व शिक्षणात आरक्षण मिळावे या मागणीला जोर चढला. व्ही. पी. सिंग पंतप्रधान असताना त्यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी स्वीकारल्याचे जाहीर केल्यानंतर देशात अनेक ठिकाणी विरोधाचा आगडोंब उसळला. सन २०१० मध्ये लालूप्रसाद यादव मुलायम सिंह यादव यांनी जातनिहाय गणना व्हावी म्हणून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग सरकारवर बराच दबाव आणला होता. यूपीए सरकारच्या काळात सामाजिक-आर्थिक जातनिहाय गणना करण्याचा प्रयोग झाला. २०१३ मध्ये काम पूर्ण झाले. पण त्याचा तपशील पुढे कधी आला नाही. मंडल आयोगाने दिलेल्या अहवालात ओबीसींचा आकडा ५२ टक्के आहे. पण तो २०११ च्या जनगणनेवर आधारित आहे. बिहार मॉडेलचे मोदी सरकार भविष्यात अनुकरण करेल की नाही हे गुलदस्त्यात आहे, पण बिगर भाजप राज्यांतून अशा मागणीला जोर चढू लागला आहे.

# सिस्टम विरोधात लढणारा अंकुश चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित

अंकुश हा मराठी चित्रपट ६ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला या चित्रपटाचे दिग्दर्शक निशांत ढापसे यांचा हा पहिला चित्रपट आहे बारीक-सारीक चुका सोडल्या तर एक चांगलं दिग्दर्शन त्यांनी केलंय व त्यांच्यासाठी त्यांचा कौतुक केलं गेलं पाहिजे या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दीपराज (अंकुश )तर केतकी माटेगावकर (रावी) असून सिनियर कलाकार देखील आहेत ज्यात सयाजी शिंदे भारत गणेशपुरे मंगेश देसाई गौरव मोरे चिन्मय उदगीरकर शशांक शेंडे यासह अन्य ओळखीचे चेहरे देखील आहेत शिवाय या चित्रपटात आपल्या धुळ्याचा तरुण सिद्धार्थ बाविस्कर यांनी देखील छोटीशी भूमिका साकारली आहे







एका राजकीय ड्रामा सहित एक एक प्रेम कथा अवतीभोवती फिरते असा हा चित्रपट आहे म्हणजे एक नायक जो सिस्टमच्या विरोधात लढतोय सोबतच एक प्रेम कथा ही फिरते अंकुश आणि रावी यांची ही लव स्टोरी जी नेहमी सोबतच असतात व एकमेकांना सपोर्ट करताना दिसून येतात अंकुश एक सामान्य कुटुंबातील हुशार मुलगा ज्याच्या परिवाराला त्याच्याकडून खूप सारे अपेक्षा असतात की त्याने खूप अभ्यास करावा खूप चांगलं शिकावं आणि एक मोठा माणूस व्हावं परंतु त्याच्या जीवनात एक अशी घटना घडते की त्यामुळे तो चुकीच्या मार्गाला लागतो आणि त्यामुळे त्याला कॉलेजमधील मुलं टिंगल करतात व चिडवतात आता रावीने त्याला एक चांगला मुलगा म्हणून त्याच्यावर प्रेम केलं त्याला आपल्या सोबत ठेवलं आणि आता तू चुकीच्या मार्गाला लागला आहे म्हणून त्याला परत सुधारण्याचा प्रयत्न करते अशी ही एक साधारण स्टोरी आहे या चित्रपटात ॲक्शन सीन्स आहेत काही ठिकाणी त्याचा अतिरेक होताना दिसून येतो शिवाय काही गाणी आहेत जी ठीकठाक आहेत परंतु प्रामुख्याने एक गाणं आकर्षित करतं ते गाणं म्हणजे दहीहंडीच ज्यात जवळजवळ ६०० ते ७०० डान्सर आहेत आणि ते एक गाणं मोठे स्केलवर शूट केलेले दिसून येत एकंदरीतच एक साधारण कथा जी यापूर्वी देखील आपण पाहिली असावी असं वाटतं अभिनयाच्या बाबतीत बोलायच झालं तर दीपराजचा हा पहिला सिनेमा आहे तरी त्यांनी छान अभिनय करण्याचा प्रयत्न केला आहे केतकी माटेगावकर या आदी आपण तिचे चित्रपट पाहिलेत तिचा अभिनय छान आहे यासह अन्य सीनियर कलावंत यांनी देखील आपल्या वाटेला आलेली भूमिका छान साकारली आहे एकूणच एक मसाला फिल्म आहे


## शब्दकोडे-१९९

**आडवे शब्द**

१. '.... एकांती मजसमीप तीच तू ही कामिनी' सुधीर फडके यांचे शांता शेळके रचित भावगीत १०. दु:ख ११. जोम की वेदना? १२. रजनी, यामिनी १४. अवधान, लक्ष १५. मृत्तिका १६. नृत्यू १७. उगीच १९. दिवस २०. कुबेराचा सेवक २१. जिव्हा, जीभ २३. वर्ष, सन २४. गवंडी २६. अवास्तव, अवाच्या सवा २९. राज ठाकरे यांचा पक्ष ३१. प्रत्येक ३२. विदूषक-प्राण्यांचा खेळ ३३. श्रीकृष्णाचा अर्जुनला उपदेश ३४. श्वसनेंद्रिय ३५. उबदार पांघरुण (इंग्रेजी) ३६. इतके ३७. नुकसान ३८. अंगाने जाड, स्थूल ३९. चलाख, शहाणा ४०. चांदणी ४१. मालक ४३. महाराष्ट्राचे छत्रपती ४५. सामान्य, साधारण ४७. शोध, माग ४९. हत्ती ५१. पंख ५२. रमणीय ५३. कूळ कायद्याचे तत्त्व ५६. बस्तान ५८. चेष्टेखोर ६०. समोरासमोरची चकमक ६१. फळातील खाण्याचा भाग ६२. लोकनाट्य ६३. न्याहरी ६४. पातक ६५. प्रचंड आरडाओरड, गोंधळ ६६. आपलेपणा ६७. सगळीकडे ६८. शंकर ६९. वडिलांची आई ७०. एक मिश्र धातू ७१. सुंदर तरुणी ७२. गप्प बसणे ७३. उद्याच्या नंतरचा दिवस

**उभे शब्द**

२. विनिमयाचे साधन ३. गरीब ४. डोके, वरचा भाग ५. महाराष्ट्रात या दोन विरोधी पक्षांची युती आहे ६. टिकाव ७. सजीव निर्जीव सर्व भाग ८. पालवी फुटण्याचा मराठी महिना ९. वेदना १३. मोठा हातोडा १७. च्या शिवाय १८. रात्री चमकणारा कीडा २२. चंदन उगाळण्याचे साधन २३. धैर्य २४. देशस्तवन २५. वारा २६. अगम्य २७. विष २८. लढतना आलेला मृत्यू २९. चर्चा ३०. सैन्य ३६. नाराजी ३७. ऐट, दिमाख ३९. शिव्याशाप ४०. नुकतीच खुडलेली (भाजी, फुले इ.) ४२. खात्री ४४. गर ४६. खोटे कारण ४८. वाकडा नसलेला ५०. वतनदार ५३. पंकज ५४. राजीनामा ५५. भेग, फट ५७. मशाल हातात धरणारा ५९. चौकशी ६०. शेतजमिनीवरील कर ६२. बूड, सैन्याचा मुक्काम ६३. विरक्त ६४. गणपतीची आई ६५. गुढ, अवघड ६६. चालू दिवस ६९. कुंभाराची भट्टी



## शब्दकोडे १९८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नजरानजर ५.सदुपयोग ८.पुजारी १०.गरज ११.डसणे १३.वर्तमानपत्र १६.तलवार १८.तास १९.झापड २०.कीर २२.राम २४.ठाणेकर २६.रकाना २८.क्षमा २९.यमन ३१.मदत ३२.गमक ३५.तनमनधन ३८.काव ३९.कोमट ४०.गजराज ४२.कापरा ४३.समस्त ४४.वाळवंट ४६.आबाळ ४८.लकवा ५०.वडीलधारी ५२.देव ५४.मनोमनी ५५.हरकत ५७.आराधना ५९.जयजयकार ६२.डफ ६३.रीत ६४.दशक ६६.सावतामाळी ६८.जाहीरनामा ७०.चोख ७१.पोर ७२.रव ७३.कात ७४.पाककला ७६.शीतल ७७.जवळजवळ

**उभे उत्तर**

१.नगद नारायण २.जर ३.राजवट ४.रदन ५.सर्वत्र ६.परतपरत ७.गडवा ८.पुणे ९.रीतसर १२.सरकी १४.माखणे १५.पगार १७.लडका २१.रक्षक २३.मम २५.कर्दनकाळ २७.नाग ३०.नतमस्तक ३१.मनगट ३३.मस्त ३४.कावराबावरा ३६.नट ३७.रोज ३८.काप ३९.कोमल ४१.राखुंडी ४२.काळ ४५.वंदनीय ४६.आधार ४७.बारीक ४९.वामनावतार ५०.वलय ५१.लहर ५३.जुआरी ५६.तडक ५८.रातसार ६०.जन्मजात ६१.कासार ६४.दमा ६५.मखलाशी ६७.मावशी ६९.नाठाळ ७०.नाक ७१.पोक ७३.काल ७४.पाव ७५.कळ

# दिवाकरांची नाट्यछटा

मराठी साहित्यविश्वातील नाट्यछटा हा महत्त्वाचा साहित्यप्रकार रुजवण्याचे श्रेय शंकर काशिनाथ गर्गे अर्थात दिवाकर यांना जाते. एक व्यक्ती इतर व्यक्तींशी बोलते आहे, असे भासवत संपूर्ण प्रसंग नाट्यपूर्ण रीतीने या साहित्यप्रकारात रचला जातो. दिवाकरांनी प्रथमत: १९११ साली पहिली नाट्यछटा लिहिली. लघू आकारातील हा साहित्यप्रकार सादरीकरणाच्या अंगाने महत्त्वाचा ठरतो. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थीजगतात आजही दिवाकरांच्या नाट्यछटांना महत्त्वाचे स्थान आहे. विरोध, क्रौर्य, कारुण्य, विसंगती, दंभ अशा अनेक पैलू व भाव-भावनांभोवती दिवाकर आपल्या नाट्यछटा विणत गेले, तर एखादी 'किती वर्णनात्मक देखावा हा, पण इकडे' यासारखी नाट्यछटा त्यांनी ललित निबंधाप्रमाणे रचली आहे. मानवी स्वभावातील विरोध ही त्यांची खास विसंगती आहे. मुलांना व्यवहारज्ञान नाही अशी तक्रार करणारा बाप 'कार्ट्या अजून कसे तुला जगातले ज्ञान नाही' या नाट्यछटेत दिसतो. पाहुण्या आलेल्या मित्राच्या खिशातली पडलेली नोट तो लपवतो. त्याचा निरागस मुलगा मी काकांच्या खिशातून पडलेला कागद बाबांकडे दिला असे सांगून टाकतो, यावरून त्याला जग समजत नाही, असे म्हणत हे महाशय गीतेवरील प्रवचन ऐकायला जातात. यातला विरोध वाचकाच्या लक्षात येतो, तेव्हा दिवाकरांच्या शैलीचे कौतुक वाटते. 'हे फारच बोवा', 'म्हातारा न इतुका', 'हलवाई' या मानवी स्वभावातील विरोध दाखवणाऱ्या नाट्यछटा आहेत. घरात विधवा मुलगी असताना उतारवयात स्वत:चे दुसरे लग्न करायला निघालेला बाप 'अशा शुभदिनी रडून कसे चालेल' या नाट्यछटेत दिसतो, तर 'कोण मेले म्हणजे रडू येत नाही' या नाट्यछटेत आनंदी नावाच्या विधवा स्त्रीचा मृत्यू हा विषय आहे. दिवाकर यांना स्त्रियांवरील अन्यायांची व त्यांच्या व्यथांची स्पष्ट जाणीव होती, हे या नाट्यछटांमधून जाणवते. माणसांबरोबरच दिवाकरांनी मुक्या प्राण्यांच्या वेदना पकडण्याचा प्रयत्न केला आहे. 'शेवटची किंकाळी' या नाट्यछटेतून एका कुत्र्याचा आक्रोश मुखर होतो. दिवाकर यांनी काही नाट्यछटांमध्ये काव्यमय शैली योजली आहे, तर काही ठिकाणी रूपकात्मक रचना केली आहे. 'पंत मेले, राव चढले' ही नाट्यछटा म्हणजे एका कुशल नाटककाराच्या शैलीचा आविष्कार आहे. 'असे केल्याशिवाय जगात भागत नाही' या नाट्यछटेत मिश्किल अंगाने स्तुतीपाठक व खुशामतखोर यांचे व्यक्तिचित्रच उभे केले आहे.। १९११ सालच्या अखेरीस दिवाकरांना स्पष्टपणे दिसेनासे झाले. आपल्याला अंधत्व आले, तर हा विचार त्यांच्या मनात वारंवार येत असावा. स्वतःचा हा दुखद अनुभव 'सगळे जग मला दुष्ट नाही का म्हणणार' या नाट्यछटेतून साकारला आहे. स्वतःला पडलेल्या स्वप्नांवर त्यांनी लिहिले तसेच आपल्या वेदनेलाही त्यांनी नाट्यछटारूप दिले. जीवनाचे व माणसाचे अनेकविध रंग दिवाकरांनी छोट्याशा साहित्यप्रकारातून रेखाटले. जीवनरंगाच्या नानाविध छटा म्हणजेच दिवाकरांच्या नाट्यछटा!

**मायभाषा: डॉ. वीणा सानेकर**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मेरी मिट्टी मेरा देश अंतर्गत नाशिक मनपाची रॅली



**नाशिक । प्रतिनिधी**

मेरी मिट्टी मेरा देश या अभियाना अंतर्गत नाशिक महापालिकेच्या नाशिक पूर्व विभागाच्या वतीने जुने नाशिक परिसरात भव्य रॅली काढण्यात आली होती .या रॅलीचे प्रमुख नाशिक मनपाचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, विभागीय अधिकारी राजाराम जाधव यांसह सारडा कन्या विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थिनी आणि नाशिक मनपा अधिकारी, कर्मचारी या रॅलीत सहभागी झाले होते. मेरी मिट्टी मेरा देशाचा अमृत कलश नाशिक मनपा उपायुक्त डॉ.विजयकुमार मुंडे यांच्याकडे विभागीय अधिकारी राजाराम जाधव यांनी सुपूर्द केला.

नाशिक मनपाच्या वतीने सहाही विभागीय कार्यालयात अमृत कलश यात्रा मेरी मिट्टी मेरा देश अभियाना अंतर्गत राबविली जात असून पूर्व विभागीय कार्यालयाच्या वतीने मेनरोड परिसर, अब्दुल हमीद चौक मार्गे भद्रकाली दूध बाजार, बादशहा चौक, गाडगे महाराज पुतळा मार्गे नाशिकपूर्व विभागीय कार्याल मेनरोड येथे रॅली संपन्न झाली. भारत माता की जय वंदे मातरम च्या जयघोषात मातीचा कलश घेऊन सारडा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थीनीं, शिक्षक आणि मनपा अधिकारी कर्मचारी यांनी रॅलीत सहभाग नोंदवला.

या रॅलीचा समारोप नाशिक पूर्व विभागीय



कार्यालय येथे संपन्न झाला. यावेळी उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांनी या अमृत कलशाचे महत्व उपस्थिताना विशद करून देशभक्तीपर नवंचेतना जागविण्याच्या दृष्टीने हा अमृत कलश नाशिक ते मुंबई व मुंबई ते दिल्ली प्रवास करून दिल्ली येथें निर्माण होणाऱ्या अमृत उद्यानात नाशिकच्या मातीचा देखील सहभाग असेल असे नमूद करून पर्यावरण पूरक जनजागृतीचा संदेश या रॅलीद्वारे देण्यात आला. देशभक्तीपर वातावरण निर्मिती करण्याचे कार्य सारडा कन्या विद्यालयाने केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन यावेळी डॉ. मुंडे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले. नेहरू युवा केंद्राच्या वतीने नाशिक मनपाचा कलश घेऊन जाणारे युवा स्वयंसेवक ज्येष्ठ अभिनेते प्रथमेश जाधव कंकाल यांचे स्वागत विभागीय अधिकारी राजाराम जाधव यांनी केले. यावेळी उपअभियंता भु.ग.यो. गाजूल, उपअभियंता पाणीपुरवठा नाईक, अभियंता सार्व. बांधकाम दारासिंग जाधव, डी. बी. जगताप भु. ग. यो, करके विद्युत विभाग, पैठणकर विद्युत विभाग, सारडा कन्या शाळेचे उपमुख्यपक गंगाधर बदादे, शिक्षक चंद्रात्रे, सूर्यभान जगताप, ओमकार वैरागकर, नाशिक पूर्व विभागातील प्रभारी अधीक्षक चंदन घुगे, परदेशी कापसे, गजानन मोरे, पगारे, जुबेर सय्यद, विक्रम रेवर, सारंग व कुणाल जाधव, अनिकेत खेलुकर, गणेश कासार, दत्ता क्षीरसागर, माणिक इंगळे, निखिल तेजाळे, संकेत खैरनार, प्रसाद डोईफोडे, विद्युत विभागातील सर्व कर्मचारी तसेच विभागीय कार्यालय नाशिक पूर्व मधील सर्व महिला व पुरुष कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते. रॅलीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले.

## न्यूज कॉलम

### व्यंकटेश बालाजी संस्थानातर्फे ब्रह्मोत्सव

**नाशिक ।** कापड बाजार येथील श्री व्यंकटेश बालाजी संस्थान ट्रस्टतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही ब्रह्मोत्सवाचे (नवरात्रोत्सव) आयोजन करण्यात आले आहे. ब्रह्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कोजागरीपर्यंत सुरू असलेल्या या महोत्सवाचा नाशिककरांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानातर्फे करण्यात आले आहे. अष्टक भुपाळी, सकाळी साडेनऊ ते साडेदहा श्रींची मंदिर परिक्रमा, शेजारती असे कार्यक्रम होतील. सोमवारी (द्वितीया)ध्वजपूजन, (ता.२०) सायंकाळी सहा वाजता श्रींचा विवाहसमारंभ (कल्याणोत्सव), (ता.२४) सकाळी दहा वाजता पवमान अभिषेक, (ता.२५) सायंकाळी सात वाजता पवमान अभिषेक, (ता.२६) दुपारी १२ ते २ दरम्यान भंडारा (श्रींचा महाप्रसाद) तर गोपालकाला, शनिवारी (ता.२८) कोजागिरी पोर्णिमा रासोत्सव असे कार्यक्रम होणार आहेत.

## निधन वार्ता

### नर्मदाबाई लाडे

**साक्री ।** येथील नर्मदाबाई दौलतराव लाडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या निवृत्त कृषी अधिकारी कै डीडी भोई यांच्या पत्नी तर नाशिक येथील बांधकाम व्यवसायिक चंद्रकांत लाडे यांच्या आई आणि प्रतीक, अभिषेक व दुर्वेश लाडे यांच्या आजी होत्या.



# विजेत्यांनी यशाच्या शिखरावर उतुंग भरारी घेण्यासाठी तयार रहावे : बडगुजर

**इंदिरानगर । प्रतिनिधी**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट प्रणित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा शिवसेनेचे महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच पार पडला. यावेळी विजेत्यांचा महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. विजेत्यांनी हुरळून न जाता भविष्यात येणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशाच्या शिखरावर उतुंग भरारी घेण्यासाठी तयार रहावे असे आवाहन सुधाकर बडगुजर यांनी यावेळी केले.

राणेनगर परिसरातील शारदा विद्यालय समोरील मोकळ्या मैदानात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्यावतीने गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भव्य दिव्य असा आनंदमेळा सुद्धा भरविण्यात आला होता. गणेशोत्सवाचे औचित्य साधून गणेशोत्सव काळात परिसरातील नवोदित कलाकारांना चांगले व्यासपीठ निर्माण व्हावे त्याचप्रमाणे त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विभागप्रमुख विनोद तथा बंडु दळवी आणि उपविभाग प्रमुख सागर देशमुख यांच्यावतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर शिवसेना महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर, अशोक पाटील, सुभाष गायधनी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी आयोजक तथा शिवसेना विभाग प्रमुख विनोद दळवी आणि उपविभाग प्रमुख सागर देशमुख यांनी मान्यवरांचे स्वागत केले. विजेत्यांनी हुरळून न जाता भविष्यात येणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशाच्या शिखरावर उतुंग भरारी घेण्यासाठी तयार रहावे असे आवाहन सुधाकर बडगुजर यांनी यावेळी केले. यावेळी महेश चव्हाण, कौस्तुभ दळवी, पुजा देशमुख, वैशाली दळवी, पल्लवी जाधव, राजाभाऊ कदम आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# भाविक मंडळाच्या अध्यक्षपदी हभप अंकुश काकडेंची निवड

**नाशिक । प्रतिनिधी**



ह भ प श्री अंकुश प्रकाश काकड यांची पंचवटी अखिल भाविक वारकरी मंडळ अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे श्री अंकुश काकड हे मखमालाबाद येथे वारकरी संप्रदाय कार्य करतात त्याची निवड मंडळाचे जिल्हा अध्यक्ष ह भ प श्री अशोक महाराज गागुंर्डे यांनी त्यांची निवड केली आहे यांच्या निवडीचे प्रदेश संर्पक प्रमुख ह भ प श्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर राष्ट्रीय अध्यक्ष ह भ प श्री सुधाकर महाराज इंगळे सोलापूर प्रदेश अध्यक्ष ह भ प श्री ज्योतीराव चागभले मंडळाचे जिल्हा अध्यक्ष ह भ प श्री अशोक महाराज गागुंर्डे जिल्हा महिला समिती अध्यक्ष ह भ प सौ सुमनताई शिंदे जिल्हा महिला समिती सचिव ह भ प सौ शालिनीताई पाटील जिल्हा सचिव ह भ प श्री विलास सागंळे जिल्हा संघटक ह भ प श्री हिरामण जायभावे नाशिक शहर अध्यक्ष ह भ प श्री संजय महाराज सोनवणे शहर सचिव ह भ प श्री सतिश महाराज सानप सिडको अध्यक्ष ह भ प श्री नवनाथ नागरे यांनी त्याचे अभिनंदन केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सह्याद्री युवक मंडळ राणेनगरच्या गरबा-दांडीयात चंदेरी दुनियेतील नामवंत तारका खेळणार

### पैठण्या, सोन्याच्या नथी, क्टिवा जिंकण्याची संधी

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

सह्याद्री युवक मंडळ राणेनगर आणि पाथर्डी पंचक्रोशी कला क्रिडा सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १५ ऑक्टोबरपासून गामणे मैदानावर भव्य दिव्य असा दररोज सायंकाळी ७वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत गरबा-दांडीयाचे आयोजन करण्यात आले आहे. या दहाही दिवसात चंदेरी दुनियेतील विविध नामवंत तारकांसोबत गरबा दांडीया खेळण्याची संधी सह्याद्री युवक मंडळ आणि पाथर्डी पंचक्रोशी कला क्रिडा सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दांडीया प्रेमींसाठी आयोजकांनी उपलब्ध करून दिली आहे.

सलग दहा दिवस चालणार्या या दांडीया उत्सवाच्या दरम्यान स्टार प्रवाहवर सुरु असलेल्या 'तुझच मी गीत गात आहे' या मराठी मालिकेचील स्वराची भुमिका साकारणारी अनवी तायवडे ही बालकलाकार तसेच अबोली मालिकेतील अबोलीची भुमिका साकारणारी गौरी कुलकर्णी, सहकुटुंब सह परिवार मालिकेतील अवनीची



भुमीका साकारणारी मुख्य कलाकार साक्षी गांधी, देवमाणूस आणि वैजु नंबर वन या लोकप्रिय मालिकेतील नृत्यांगना तथा मुख्य कलाकार सोनाली पाटील, तुझ्यात जीव रंगला आणि तुला शिकविन चांगलाच धडा या मालिकेतील दुर्गेश्वरीची भुमिका साकरणारी दीप्ती सोनवणे आदी कलाकार सहभागी होणार आहेत.

तसेच विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना २५१ पैठणी,१५१ सोन्याच्या नथी, २ एक्टिव्हा गाडी, त्याच प्रमाणे २ देव्हारे (देवघर) तसेच ५०० फ्रि पेट्रोल कुपन बक्षीस देण्यात येणार आहे. गरबा दांडीया उत्सवाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसाठी ५० सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहेत. तसेच संपूर्ण मैदानावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलिस कर्मचार्यांसाठी सर्व सोयीसुविधायुक्त तात्पुरती पोलिस चौकी उभारण्यात येणार आहेत. दांडीया मैदानावर १ रुग्णवाहिका, मदत केंद्र, प्रथमोपचार सज्ज ठेवण्यात येणार आहे. गामणे मैदानावर प्रशस्त मंडप उभारून त्यामध्ये १५ फुट उंचीची दुर्गादेवीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. गामणे मैदानावर होणार्या या दांडीया उत्सवाच्या काळात खाद्य जत्राही होणार आहे. या जत्रेत प्रभागातील बचतगटातील स्वयमरोजगार आणि गरजू महिलांसाठी सुमारे ३०० हुन अधिक मोफत स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. दहादिवस चालणा-या दांडीया गरबा उत्सवात चंदेरी दुनियेतील नक्षत्रा सारख्या सिनेतारकांचा सहभाग तसेच मोठ्या प्रमाणावर बक्षिसांची लयलूट, खाद्यजत्रा अशा सर्व कार्यक्रमांला गरबा-दांडीयाप्रेमींनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजक माजी नगरसेवक अमोल जाधव, सुदाम डेमसे, भगवान दोंदे, माजी नगरसेविका संगीता जाधव, राष्ट्रवादी कॉग्रेसचे देवळाली विधानसभा अध्यक्ष सोमनाथ बोराडे सह मंडळाचे पदाधिकारी आदींनी केले आहे

# डोकेदुखी टाळण्यासाठी रात्रीची चांगली झोप गरजेची : डॉ. दिवाण





### सरस्वती हास्य योग केंद्रातर्फे व्याख्यान

**नाशिक । प्रतिनिधी**

डोकेदुखी, मायग्रेन आणि व्हर्टिगो या सामान्य लोकसंख्येमध्ये सामान्य समस्या आहेत. बहुतेक वेळा डोकेदुखी हे मायग्रेन किंवा टेन्शन यामुळे डोकेदुखीमुळे होते.

डोकेदुखी, आम्लपित्त, मानदुखी, मळमळ आणि चक्कर येणे ही मायग्रेनशी संबंधित लक्षणे आहेत. तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मायग्रेनशी संबंधित डोकेदुखी टाळण्यासाठी नियमित आणि चांगली रात्रीची झोप, नियमित आरोग्यदायी आहार, दररोज ३०-४० मिनिटांचा व्यायाम आवश्यक असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पिटल चे मेंदू व मणके विकार तज्ज्ञ डॉ. आनंद दिवाण यांनी केले.

महिलांमध्ये वाढत जाणारी डोकेदुखी व चक्करच्या तक्रारी याविषयी महिलांमध्ये जनजागृती होण्यासाठी सरस्वती हास्य योग केंद्रातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमा वेळी डॉ. दिवाण बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेविका संगीता जाधव, अध्यक्षा अरुणा जाधव, सीमा देवदास, टी. आर. येवले, आप्पा बाविस्कर उपस्थित होते.

डॉ. दिवाण म्हणाले की, व्हर्टिगो देखील खूप सामान्य आहे-बहुतेक वेळा स्थितीसंबंधी व्हर्टिगो किंवा मायग्रेन संबंधित व्हर्टिगोचे निदान करण्यासाठी आणि उपचार घेण्यासाठी मेंदू विकार तज्ञाची भेट आवश्यक आहे. आज काल लोक डॉक्टरांना दाखविण्याएवजी घरगुती उपाय करतात. परंतु असे करून आजार वाढविण्यापेक्षा त्वरित डॉकरांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास मोठया संख्येने महिला उपस्थित होत्या.

# अद्यावत तंत्रज्ञानामुळे प्रभावी उपचार शक्य : डॉ. रमेश सातारकर

### 'महाआयएसजीकॉन २०२३'चे दिमाखात उद्घाटन

**नाशिक । प्रतिनिधी**

इतर प्रत्येक क्षेत्राप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रातही तंत्रज्ञानामुळे अमुलाग्र बदल होत आहेत. आजाराचे निदान करण्यापासून शस्त्रक्रिया, अन्य उपचारात आधुनिक तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पोटांच्या विकारासंदर्भातही अत्यावस्थ स्वरुपातील रुग्णांवर तंत्रज्ञानाद्वारे सुलभरित्या उपचार करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन इंडियन सोसायटी ऑफ गॅस्ट्रॉइन्ट्रालॉजीच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष डॉ.रमेश सातारकर यांनी केले.



### श्रेयस तळपदे यांनी मानले डॉक्टरांचे आभार

**उद्घाटन कार्यक्रमास अभिनेते श्रेयस तळपदे यांची विशेष उपस्थिती राहिली. धकाधकीच्या जीवनात आजारपणाचा सामना करणार्या रुग्णांना दिलासा देणाऱ्या डॉक्टरांचे आभार त्यांनी मानले. पोटाचे विकार दूर करत अखंडितपणे रुग्णसेवा करणार्या उपस्थित डॉक्टरांचे त्यांनी कौतुक केले.**

इंडियन सोसायटी ऑफ गॅस्ट्रॉइन्ट्रालॉजी आणि नाशिक गॅस्ट्रॉइन्ट्रालॉजी सोसायटी यांच्या वतीने हॉटेल रॅडिसन्स ब्ल्यू येथे आयोजित 'महाआयएसजीकॉन २०२३' या राज्यस्तरीय परीषदेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. परीषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.नितीन बोरसे, आयोजन समिती सचिव डॉ.हुसेन बोहरी, खजिनदार डॉ.संदीप पाटील, सहखजिनदार डॉ. शरद देशमुख उपस्थित होते. यावेळी डॉ.विवेकानंद कुलकर्णी, डॉ.श्रीकांत मुकेवार, डॉ.अमित मायदेव यांना लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड अर्थात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अत्यावस्थ स्थितीतील उपचार पद्धती या संकल्पनेवर आधारित होत असलेल्या या परीषदेच्या पहिल्या दिवशी समुह चर्चेने सुरुवात झाली. यावेळी डॉ. विनय थोरात यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञांनी चर्चा घडविली. यानंतर पोटाच्या विकाराशी निगडीत विविध विषयांवर तज्ज्ञांनी सादरीकरणातून मार्गदर्शन केले. एंडोस्कोपिस्टची भूमिका, शल्यचिकित्सकांची भूमिका, अत्यावस्थ रुग्णांवरील उपचाराची दिशा आदींबाबत सहभागी डॉक्टरांना अद्ययावत माहिती दिली. गुंतागुंत असलेल्या रुग्णांना पहिल्या चोवीस तासांत, पहिल्या ४८ तासात उपचाराची दिशा, अत्यावस्थ रुग्णांना द्यावयाचा आहार यासह इतर मुद्यांवर चर्चा घडविण्यात आली. यानंतर सायंकाळी औपचारीक उद्घाटन समारंभ पार पडला. रविवारी (दि.८ ऑक्टोबर) दिवसभर विविध सत्रांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर सहभागींना मार्गदर्शन करण्यात आले. दोन दिवसीय 'जीआय समिट'च्या पहिल्या दिवशी सकाळपासून वेगवेगळ्या सत्रांमध्ये चर्चा झाली. परिषदेच्या आयोजनासाठी आयोजन समितीचे सदस्य डॉ.गौरव बच्छाव, डॉ.तुषार संकलेचा, डॉ.महेश पाटील, डॉ.सोहम दोशी, डॉ.धवल चौकसी, डॉ.सचिन धांडे, डॉ.सुदर्शन पाटील, डॉ.प्रतिभा पगार, डॉ.मंगेश मानगुळकर, डॉ. अद्वय आहेर, यांनी परीश्रम घेतले. आयोजन समिती सचिव डॉ. हुसेन बोहोरी यांनी आभार मानले.

# प्रतिबंधित प्लास्टिक विक्री विरोधात मनपाची दंडात्मक कारवाई

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेच्या नाशिकरोड विभागीय कार्यालय अंतर्गत प्रतिबंधित प्लास्टिक विक्री विरोधात दुसऱ्यांदा दंडात्मक कारवाई करून१०००० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच जेलरोड येथील भाजी मार्केट येथे प्रथम दंड रक्कम रुपये ५००० करण्यात आला असा एकूण १५००० रुपये दंड करण्यात आला.

कारवाई नाशिक महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. आवेश पलोड यांच्या आदेशान्वये नाशिकरोड विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र, विभागीय स्वच्छता निरीक्षक अशोक साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक विजय जाधव, सागर बारगळ, तेजस गायकवाड, स्वच्छता मुकादम रणजित हंसराज, सुनील वाघ, गुलाब शेख, अतुल भाऊसार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग व इतर वस्तू वापरू नये असे आवाहन यापूर्वी नाशिक महापालिकाच्या वतीने करण्यात आले आहे. मात्र व्यवसायिक याचा वापर करतांना आढळल्यास धडक कारवाई करण्याचे आदेश घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिले आहे.

## न्यूज कॉलम

### कसारा घाटात शिवशाही बससह चार वाहनांचा विचित्र अपघात

इगतपुरी। येथील नाशिक-मुंबई महामार्गावरील नवीन कसारा घाटात आज रविवार (दि.०८ ऑक्टोबर) रोजी सायंकाळच्या सुमारास बससह अन्य तीन वाहनांचा अपघात झाला असून या अपघातात ५ जण जखमी झाले आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, कसारा घाटात एका काळी-पिवळी इको गाडीस ट्रकने धडक देऊन अपघात झाला होता. त्या अपघातातील प्रवासी उतरून सुरक्षित ठिकाणी पोहचत असतानाच ट्रकला मागून शिवशाही बसने धडक दिली. त्यामुळे बसच्या मागे असलेला ट्रेलर ट्रक आणि बसवर जाऊन आदळला. या विचित्र अपघातात इको गाडीसह बसचे मोठे नुकसान झाले असून शिवशाई बसला पुढील व मागील बाजूस धडक बसल्याने बसने पेट घेतला होता. परंतु, बसमधील सर्व प्रवासी खाली उतरल्याने ते थोडक्यात बचावले. या विचित्र अपघातामुळे कसारा घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, पोलीसांनी अपघातग्रस्त वाहने तातडीने बाजुला केल्याने वाहतुक सुरळीत झाली. या अपघातात दोन प्रवाशांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना इगतपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

धुळे । साक्री- धुळे रस्त्यावर गॅस सिलिंडर नेणारे वाहन व दुचाकीत झालेल्या अपघातात दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना शनिवारी (ता. ७) दुपारी दीडच्या सुमारास घडली. मुस्तकीम तांबोळी (रा. निजामपूर, ता. साक्री) साक्रीहून निजामपूरकडे जात असताना गॅस सिलिंडर नेणारे वाहन व त्यांच्या दुचाकीची धडक होऊन अपघात झाला.

# धुळे जिल्ह्यातील भूमिअभिलेख कार्यालय दलालांच्या दावणीला

भूमिअभिलेख कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाला आहे. थेट कार्यालयात जाणाऱ्यांचे काम होत नसून तेच काम दलालांमार्फत केल्यास लवकर होते, असा अनुभव अनेक नागरिकांना येत असल्याने धुळे येथील भूमी अभिलेख कार्यालय डोकेदुखी ठरत आहे.



### असा आहे दलालांचा फंडा

**भूमी अभिलेख कार्यालयांत हेलपाटे मारून कंटाळलेल्या शेतकऱ्यांची या दलालांकडून आरामात शिकार केली जाते. या दलालांवर या कार्यालयांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त असतो. मात्र, या दलालांमार्फत अडलेली सर्व कामे होत असल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. दलालांच्या हाती फाइल सोपवली की पोटहिश्शाचीही मोजणी होते. नकाशाही मिळतो. त्यासाठी बऱ्याचदा खासगी सर्व्हेअरची मदत घेतली जाते. अशा नकाशावर शासकीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरीही नसते. सर्व्हेअरच स्वाक्षरी करून मोकळे होतात.**

भूमिअभिलेख कार्यालयात नोंदी, मोजणी, वारस लावण्याचे अनेक प्रकरणे धूळ खात पडले आहेत. सामान्य नागरिक चकरावर चकरा मारत आहेत. या कार्यालयात गरीब शेतकऱ्यांसोबत व्यवस्थित बोललेही जात नसल्याने ते हतबल होऊन दलालांकडे जात आहेत. भूमी अभिलेख कार्यालयात असलेली शेतजमीन, प्लॉट मालमत्तेसंदर्भातील कामे लवकर करून देणाऱ्या दलालांचा कार्यालय परिसरात सुळसुळाट झाला आहे. शेती, प्लॉटची मोजणी करण्यासाठी येथील भूमी अभिलेख कार्यालय परिसरात दलालांची टोळीच निर्माण झाली आहे. आश्चर्य म्हणजे शासनाची फी भरूनही काम होत नाही.तेच काम दलालांची टोळी आठ दिवसात करून दाखवतात. त्यामुळे हे कार्यालय जणू काही दलालच चालवत आहेत काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

भूमी अभिलेख कार्यालयातील क्लिष्ट कार्यप्रणालीमुळे सामान्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कार्यालयात नव्याने जाणारा व्यक्ती गोंधळून जातो. या ठिकाणी कुणीही दलाल कार्यरत नाही अशा सूचना लावलेल्या आहेत. परंतू कार्यालयाच्या फाटका पासून ते कार्यालयात जाईपर्यंत परिसरात अनेक दलाल भेटतात. कार्यालयातील कामकाज आपल्यामार्फतच व्हावे, म्हणून या दलालांनी एक प्रकारे रॅकेटच बनवले आहे. त्या टोळीत एजंट, नंतर काही कर्मचारी व अधिकारी सुद्धा सक्रिय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कारण सामान्य माणसाचे कोणतेही काम या दलालांशिवाय पूर्णच होत नसल्याचे चित्र आहे.तालुक्यात शेतीमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. तसेच वडिलोपार्जित शेतीची जपणूकही केली जात आहे. शेती घेणारे अनेकजण असले तरी विक्री क्वचित करीत आहेत. त्यामुळे शेतीच्या किमती लाखोंच्या घरात गेल्या आहेत. शेतीलाही महत्त्व आले आहे. बांधावरून होणारे वादटाळण्यासाठी प्रत्येकजण शेतीची मोजणी करून हद्द कायम करण्याला प्राधान्य देत आहेत.

# अन्न व औषध प्रशासन विभागाची सप्तशृंगी गडावर दहा पेढे विक्रेत्यांवर कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

अवघ्या काही दिवसांवर आदिशक्तीच्या उदो उदो करणारा नवरात्रौत्सव येऊन ठेपला आहे. या काळात लाखो भाविक सप्तशृंगीच्या दर्शनासाठी गडावर जात असतात. मात्र याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने गडावर जात प्रसादाच्या दुकानांची तपासणी करत दहा पेढा विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे ऐन नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कारवाई करण्यात आल्याने भाविकांच्या जीविताशी पेढा विक्रेते खेळत असल्याचे समोर आले आहे.

नवरात्रीत राज्यभरातून भाविक सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर वर्षभरही भाविकांचा गडावर राबता असतो. पुढील आठवड्यापासून सुरु होणाऱ्या नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सप्तश्रृंगी गड वणी या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्याठिकाणी लोक प्रसाद म्हणून पेढे, कलाकंद इत्यादींची खरेदी करतात. त्यामुळे भाविकांना दर्जेदार अन्नपदार्थ मिळण्याकरिता अन्न व औषध प्रशासन नेहमीच तत्परतेने कार्यरत असते.




### नवरात्रीत आदिशक्तीचे २४ तास दर्शन

**सप्तशृंगी देवी विश्वस्त संस्थानने भाविकांसाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. नवरात्रोत्सवात भाविकांना सप्तशृंगीदेवी चे २४ तास दर्शन खुले राहणार आहे. सर्व शासकीय अधिकारी, सप्तशृंग निवासिनी ट्रस्ट विश्वस्त, व्यवस्थापक ग्रामपंचायत आदींच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. नवरात्रीत राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत आहेत. दरम्यान या कालावधीत गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता सप्तशृंगगड येथे सप्तशृंगी देवीची दर्शन व्यवस्था २४ तास सुरू राहणार आहे. भाविकांची संभाव्य गर्दी विचारात घेवून विश्वस्त संस्थेने श्री भगवती - श्री सप्तशृंगी मातेचे मंदिर हे १५ ते २४ ऑक्टोबरपर्यंत दर्शनासाठी २४ तास खुले ठेवून भाविकांना श्री सप्तशृंगी मातेच्या दर्शनाची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

### कारवाई होणे गरजेचे

**अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईचे भाविक व नागरिकांचा वतीने स्वागत करण्यात येत आहे. तसेच काही दिवसांपूर्वी त्र्यंबकेश्वर याठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने गुजरात राज्यातून येणाऱ्या भेसळयुक्त पेढ्यांसंदर्भात कारवाई केली होती. त्यानंतर दुसरी कारवाई सप्तशृंगीगड येथे करण्यात आली. मात्र, हा एक्स्पायरी डेट नसणारा भेसळयुक्त पेढा गुजरात राज्यातून महाराष्ट्रात कसा पोहच केला जातो व महाराष्ट्रात कोण होलसेल करून नागरिकांच्या जीवाशी खेळतो आहे, अशा दोषींवर कारवाई होणे गरजेचे आहे.**

त्याचाच भाग म्हणून प्रशासनामार्फत सप्तश्रृंगी गडावर तपासणी मोहिम राबविण्यात येवून आली यात दहा पेढे विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या विक्रेत्यांकडे विक्रीसाठी असलेल्या मालावर कुठल्याही प्रकारचे बेस्ट बिफ़ोरचे टॅग न देण्यात आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान सप्तशृंगी गडावरील विक्रेते अक्षय रामचंद्र बाटै यांचे आई भगवती पेढा सेंटर, कुंडलिक ईश्वर शिंगटे यांचे भगवती पेढा सेंटर, रणजित नागनाथ सायकर यांचे आई साहेब पेढा सेंटर, हनुमंत परसु यादर यांचे पेढा विक्री केंद्र, केशव श्रीरंग खुणे यांचे आराध्या पेढा सेंटर, गौरख दादा हरी साळुंके यांचे भगवती प्रसाद पैढा सेंटर, संदीप शशीकांत बेनके यांचे पेठा विक्री केंद्र, विठ्ठल रावसाहेब शिंदे यांचे जय माँ सप्तश्रृंगी पेढा सेंटर, संदीप नारायण अडगळे यांचे भगवती पैदा सेंटर, प्रल्हाद नामदेव गव्हाणे यांचे मयुरी प्रसाद पेढा सेंटर आदी १० विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी दुधजन्य पदार्थ विक्रीसाठी साठविल्याचे आढळून आले. परंतू त्यावर कुठल्याही प्रकारचे अंतिम टिकण्याची क्षमता याबाबतचे टॅग नसल्याचे आढळले. तसेच अन्न सुरक्षा मानके कायदयाच्या स्वच्छतेविषयक बाबींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले. त्यामुळे या सर्व पैढ़ा विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा मानके कायदयाच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.

# न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या रक्तदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद



सिडको । प्रतिनिधी

जिल्हा सामान्य रूग्णालय आणि नाशिक जिल्हा न्यायालयीन सर्व कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण इमारतीमध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबीराचे उदघाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जगमलानी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक वकील बार संघाचे अध्यक्ष व मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे व जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयाचे अतिरिक्त सिव्हिल सर्जन डॉ. नीलेश पाटील उपस्थित होते.

रक्तदान शिबिरमध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जगमलानी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर करंकाळ, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव इंदलकर तसेच अन्य न्यायाधीशांनी देखील रक्तदान केले. तसेच न्यायालयीन व्यवस्थापक दारके, प्रबंधक नागमोती यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरात असंख्य कर्मचार्यांनी आणि वकीलवृंदानी मोठ्या संख्येने सहभाग घेवुन रक्तदान केले. त्याबद्दल नाशिक जिल्हा न्यायालयीन सर्व कर्मचारी संघटना यांनी आभार व्यक्त केले आहे.

रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट क) चे अध्यक्ष दादा निकम, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी संघटना (गट ड) चे अध्यक्ष जयदेव पवार, नाशिक जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना (गट क) चे अध्यक्ष दीपक मोरवाल, लघुलेखक संघटनेचे अध्यक्ष शैलेश आखाडे तसेच पतसंस्था उपाध्यक्ष संतोष परदेशी, सचिव शिवानंद जाधव, संचालक राजेश टिभे, किशोर माने, विलास कवडे, संतोष वाघचौरे तसेच संघटनेचे पदाधिकारी वैभव देवरे, उमेश जाधव, अमित पवार, सोमनाथ भालेराव, पोपटराव बस्ते, देविदास लोहकरे, नरेंद्र जाधव आदी न्यायालयीन कर्मचारी यांनी यशस्वी करण्यासाठी मदत केली.

# अर्थे खु. येथील वि.का.स. सोसायटीची गेल्या १५ वर्षांपासून १०० टक्के वसुली

शिरपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील अर्थे खु. येथील वि.का.स. सोसायटीची गेल्या १५ वर्षांपासून १०० टक्के वसुली बद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

वि. का. सोसायटीने गेल्या १५ वर्षांपासून १०० टक्के वसुली करून सातत्याने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विकास सोसायटीने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून १ कोटी ७१ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले असून वार्षिक २ लाख रुपये नफा प्राप्त केला आहे. या सोसायटीत ३० लाख रुपये पर्यंत फिक्स डिपॉझिट रक्कम असून धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने बँकेचे चेअरमन माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रभाकरराव चव्हाण व अनेक मान्यवरांच्या हस्ते सर्वसाधारण सभेत विशेष गौरव करण्यात आला.

अर्थे खु. विकास सोसायटीचे चेअरमन भटू रामदास पाटील, व्हाईस चेअरमन गुलाब गवळे, सर्व संचालक मंडळ तसेच शिरपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती दीपक गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली विकास सोसायटीची यशस्वी



घोडदौड सुरू आहे. त्यांच्या या विशेष कामगिरीबद्दल माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल, जिल्हा बँकेचे संचालक प्रभाकरराव चव्हाण, माजी जि. प. अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, जिल्हा बँकेच्या संचालिका सीमाताई रंधे व अनेक पदाधिकारी यांनी कौतुक केले आहे.

# ग्रामिण भागात क्षयरुग्ण शोध मोहिमेचे आयोजन

धुळे । प्रतिनिधी

धुळे ग्रामीण भागात ३ ऑक्टोंबर ते १३ ऑक्टोंबर २०२३ या कालावधीत क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सोनिया बागडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

या क्षयरोग मोहिमेतंर्गत धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १ लाख ९० हजार ७६६ नागरिकांची या मोहिमेदरम्यान घरोघरी जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. क्षयरुग्ण शोध मोहीमेच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय अधिकारी, आशा वर्कर, सर्व क्षयरोग विभागातील कर्मचारी धुळे ग्रामीण भागातील अति जोखमीच्या भागात जाऊन ३८ हजार १५३ घरांचे सर्वेक्षण करुन क्षयरोगांची लक्षणे आढळणाऱ्या रुग्णाची मोफत थुंकीचे नमुने तपासणी व एक्सरे तपासणीसाठी घेण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी आशा सेविका, क्षेत्रीय कर्मचारी, स्वंयसेवक,पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच ज्या घरातील सदस्यांची तपासणी झाल्यावर अशा घरावर चिन्हांकीत करण्यात येणार आहे. तरी धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी या क्षयरोग शोध मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सोनिया बागडे यांनी केले आहे.सर्वेक्षणासाठी आशा सेविका, क्षेत्रीय कर्मचारी, स्वंयसेवक,पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# चिंतनभाई पटेल यांचा गुर्जर समाजाकडून सत्कार



वरूळ । प्रतिनिधी

शिरपूर चिंतनभाई पटेल यांची शिरपूर शहर भाजपा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिरपूर शहरातील गुजर समाजातील मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला.

गुजर समाजाच्या वतीने चिंतनभाई पटेल यांचा सत्कार करण्यात आला. चिंतनभाई यांची नुकतीच शिरपूर शहर भाजप अध्यक्ष पदी निवड झाली आहे.पटेल यांच्या निवडी बद्दल गुजर समाजाच्या वतीने हा सत्कार करण्यात आला. यावेळी शिरपूर मेडिकल कॉलेजचे प्रोजेक्ट मॅनेजर गुलाब गुजर यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रशांत चौधरी यांनी ओळख करून दिली.

यावेळी शिरपूर दोडे गुजर समाजाचे तालुका अध्यक्ष अँ.मंगलसिंह चौधरी, जळगाव दोडे गुजर संस्थानचे उपाध्यक्ष अशोक जाधव, विश्वस्त प्रा. निश्चल पाटील,प्रा. व्ही.बी.पाटील, भाईदास गुजर, पी एस पाटील, गजानन जाधव तोंदे गावचे सरपंच राहुल चौधरी, रमेश पाटील, ईश्वर पवार, राजेंद्र पवार, चंद्रकांत पवार,प्रदीप पाटील, नितीन पाटील, नितीन जाधव, प्रवीण पाटील, अॅड. कमलेश जाधव आदी उपस्थित होते.

# तुषार बैसाने इंडियन टॅलेंट अवॉर्ड २०२३ पुरस्काराने सन्मानित

वरुळ । प्रतिनिधी

शिरपुर येथील रहिवासी व सुप्रसिध्द साहित्यिक कवि, लेखक,व्याख्याते व सिनेअभिनेते तुषार बैसाने यांना साहित्य, व्याख्यान आणि कलाक्षेत्रातील कार्याची दखल घेऊन पुणे येथे जागतिक स्तराचा इंडियन टॅलेंट अवॉर्ड २०२३ या पुरस्काराने मेघराज राजेभोसले, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ तसेस जेष्ठ अभिनेते सुनिल गोडबोले, आणि अभिनेत्री आर्या घारे यांच्या हस्ते पत्रकार भवन पुणे येथे प्रदान करण्यात आला.

तुषार बैसाणे हे सध्या शाखा प्रबंधक, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा रनाळे येथे कार्यरत आहेत. त्यांची आजवर प्रकाशित पुस्तके



आठवण, कविता संग्रह ,प्रेमसागर, कविता संग्रह तु नसतांना, कविता संग्रह गजरी, कादंबरी शेतकऱ्यांनो जागे व्हा, अव्हनात्मक चरित्र, शापित गांव, तसेच त्यांनी एक ती या मराठी चित्रपटात मुख्य भुमिका, द किलर हिंदी वेब सिरिज मध्ये महत्वपूर्ण भुमिका, तु क्यू बेवफा हैं! हिंदी अल्बम मध्ये मुख्य भुमिका केली आहे. त्यांचे आजपर्यंत धुळे, नंदुरबार, जंळगाव, परभणी, लातूर, बीड, अकोला, बुलढाना, अमरावती, मुंबई विद्यापीठ आणि संस्थाच्या माध्यमातुन ५०० च्या वरती परिसंवाद आणि व्याख्याने सुध्दा झाली आहेत. तुषार बैसाणे यांना आजपर्यंत पन्नास च्या वरती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यात विदर्भ भूषण पुरस्कार आयडॉल ऑफ विदर्भ , साहित्य कलायात्री साहित्य धारा, आण्णा भाऊ साठे स्वरांजली पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, शुभम साहित्य पुरस्कार, शुभम अध्यक्षिय पुरस्कार, शिवचरण उज्जैनकर फाऊंडेशन पुरस्कार, शिव साहित्य पुरस्कार, उज्जैनकर साहित्य पुरस्कार, तापी पुर्णा साहित्य पुरस्कार, शुभम वाड:मय पुरस्कार, यशोदिप साहित्य पुरस्कार, उष्कृष्ट साहित्य पुरस्कार, शिव बाल साहित्य संमेलन अध्यक्षिय पुरस्कार, महात्मा फुले साहित्य पुरस्कार, संत रवीदास महाराज पुरस्कार, नारायण दास महाराज साहित्य पुरस्कार, कला दर्पण साहित्य पुरस्कार, काव्यधारा पुरस्कार, साधना संगम साहित्य पुरस्कार, आणि तसेच कवी संमेलन आणि साहित्य संमेलन यांच्या माध्यमातून साहित्य क्षेत्रातून मिळालेले पुरस्कार आहेत.तसेच कलाक्षेत्रात नारायण दास महाराज उष्कृष्ट कला पुरस्कार, शुभम कला पुरस्कार, राज्यस्तरीय तापी पूर्णा उष्कृष्ट कला पुरस्कार, अंशुमन विचारे उष्कृष्ट कला पुरस्कार, डॉ. शिवचरन उज्जैनकर फांऊडेशन उष्कृष्ट कला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संस्थापाक अध्यक्ष टॅलेंट कट्टा संस्था यांचे आभार मानले आहे.

# कॉंग्रेसच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग उत्तर महाराष्ट्र अध्यक्षपदी एन.डी.पाटील

धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी अंतर्गत उत्तर महाराष्ट्र रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या अध्यक्षपदी एन.डी.पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना नुकतेच महाराष्ट्र कॉंग्रेसचे विधीमंडळ नेते माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी त्यांचा सत्कारही करण्यात आला.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील आणि महाराष्ट्र कॉंग्रेस कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांचे एकनिष्ठ समर्थक एन.डी.पाटील रा.बुरझड ता.धुळे यांची नुकतीच कॉंग्रेसच्या उत्तर महाराष्ट्र रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या शिफारशीवरुन रोजगार स्वयंरोजगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष योगेश मसलंगे पाटील,उपाध्यक्ष शांतीलाल पाटील नंदुरबार यांनी नियुक्ती केली आहे. श्री.एन.डी.पाटील हे धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक असून धुळे येथील मराठा बोर्डीगचे त्यांची चेअरमनपदही भूषविले आहे. दरम्यान त्यांनी बुरझड ता.धुळे येथील ग्रामपंचायतीचे त्यांची सरपंच व उपसरपंचपद यशस्वीपणे सांभाळले आहे.तर महाराष्ट्र शासनाच्या रोजगार हमी योजना समितीचेही ते सदस्य होते.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# जिल्हाधिकाऱ्यांनी केली 'हिरे'ची पाहणी

## सर्व विभागांची केली पाहणी आणि उपलब्ध औषध साठ्याची घेतली माहिती










धुळे । जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तत्काळ भेट देऊन पाहणी करून सद्य:स्थितीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या सूचनेनुसार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी शनिवारी भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयास भेट देऊन पाहणी केली. तसेच उपलब्ध औषध साठ्याची माहिती घेतली. योग्य उपचार, स्वच्छता, कर्मचारी भरती प्रक्रिया आदीबाबत त्यांनी सूचना दिल्या. अधिष्ठाता डॉ. अरुण मोरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक, सहयोगी प्राध्यापक डॉ. रवींद्र मिस्त्री, डॉ. अजय सुभेदार, डॉ. इम्रान तेली, डॉ.जीवन पवार, उपअधीक्षक डॉ. प्रकाश सुकळे, अधिसेविका अरुणा भराडे आदी उपस्थित होते. अतिदक्षता, सर्जिकल अतिदक्षता, नवजात शिशु विशेष काळजी कक्ष, अपघात, रक्तपेढी, प्रसूती, मध्यवर्ती औषध भांडार आदी विभागांना त्यांनी भेट दिली. रुग्णांच्या नातेवाईकांना आवश्यक सुविधा, परिसराची स्वच्छता, औषध साठ्याची माहिती ई-सुश्रुत किंवा ई- औषधी या पोर्टलवर वेळोवेळी अपलोड करण्याच्या सूचना दिल्या. रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांचीही आस्थेवाईकपणे चौकशी केली. औषध भांडार कक्षात औषधे तत्काळ उपलब्ध होण्यासाठी नंबरिंग पद्धती अवलंबण्याचे निर्देश दिले. तसेच रुग्णालयासाठी पालकमंत्री गिरीष महाजन यांच्या सूचनेनुसार जिल्हा नियोजन समिती मार्फत रुपये ५ कोटी १० लाख इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. या ठिकाणी ४८६ प्रकारची औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी श्री.गोयल यांनी प्रसुती कक्षातील महिलेच्या नातेवाईकांचीही आस्थेवाईकपणे चौकशी करून योग्य त्या सुविधा, औषधोपचार मिळतात का याची माहिती घेतली. तसेच रुग्ण कक्ष, येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना पिण्याच्या पाण्याची सोय, पुरेशी औषधे उपलब्ध आहेत याची चौकशी करून खातरजमाही केली. तसेच यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, हे रुग्णालय रुग्णालयाच्या सेवेसाठी असून येथे येणारे नागरिक व रुग्णांनी देखील येथील परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# शासकीय रुग्णालयास जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली भेट

## ४८६ प्रकारची औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध



















धुळे । जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करून सद्य:स्थितीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या सूचनेनुसार जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयास भेट देऊन पाहणी केली. यावेळी श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.अरुण मोरे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. अजित पाठक, सहयोगी प्राध्यापक डॉ.रविंद्र मिस्त्री, डॉ.अजय सुभेदार, डॉ.इम्रान तेली, डॉ.जीवन पवार, उपअधिक्षक डॉ.प्रकाश सुकळे, अधिसेविका अरुणा भराडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.गोयल यांनी या भेटी दरम्यान अतिदक्षता विभाग, सर्जिकल अतिदक्षता विभाग, नवजात शिशु विशेष काळजी कक्ष, अपघात विभाग, रक्तपेढी, प्रसुतीकक्ष, मध्यवर्ती औषध भांडार कक्षाला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी रुग्णालय प्रशासनास रुग्णांच्या नातेवाईकांना आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत सूचना दिल्यात. तसेच रुग्णालयात तसेच रुग्णालयाचा परिसर स्वच्छ ठेवावा. रुग्णालयातील औषध साठ्याची माहिती ई-सुश्रुत किंवा ई-औषधी या पोर्टलवर वेळोवेळी अपलोड करावी, आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांचीही आस्थेने चौकशी करून दाखल रुग्णावर तातडीने आवश्यक व योग्य औषधोपचार करावेत. तसेच मध्यवर्ती औषध भांडार कक्षात औषधे तात्काळ उपलब्ध होण्यासाठी नंबरीग पद्धती अवलंबण्याचे निर्देश दिले. तसेच रुग्णालयाच्या औषधे, साधनसामुग्री तसेच रुग्णालयाच्या डागडुजीसाठी प्रस्ताव सादर करण्याच्याही सूचना दिल्यात. त्याचबरोबर रुग्णालयातील रिक्तपदे भरण्यासाठी भरती प्रक्रियेला गती देण्यात येवून रुग्णालय परिसरात महिन्यातील दोन दिवस विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात यावी. आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या कोणत्याही नागरिकांना परत पाठवू नये, येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहून त्यांना आवश्यक असणारे उपचार व औषधे तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्यात.

संकलन : दिपक वाघ